महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७१ वा | दिनांक : ११/१२/२०२४ | वार : बुधवार

## सरपंच हत्या प्रकरण दाबायच्या भानगडीत पडू नका : मनोज जरांगे



**केज** : बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची सोमवारी अपहरण करून हत्या करण्यात आली. सरपंचांच्या हत्येची माहिती मिळाल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मस्साजोग गाव गाठत कुटुंबियांशी संवाद साधला. हे प्रकरण दाबण्याच्या भानगडीत पडू नका.

या प्रकरणात जातीचे लोक पाठीशी घालू नका, असे मनोज जरांगे म्हणाले. सदरील प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी सरकारकडे केली आहे. या प्रकरणाकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

मस्साजोग गावाचे सरपंच यांची सोमवारी हत्या झाल्यानंतर आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांकडून अहिल्यानगर-अहमदपूर मार्गावर मंगळवारी सकाळपासून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांना रस्त्यावरून हटवताना पोलिस आणि ग्रामस्थ आमने सामने आले होते. त्यानंतर संतप्त जमावाने एसटी बस पेटवून दिली. या दरम्यान मनोज जरांगे मस्साजोग गावात दाखल झाले होते. त्यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन ग्रामस्थांशी संवाद साधला.

न्याय पाहिजे म्हणून लोक रस्त्यावर बसले आहेत, तो रास्ता रोको नाही. या लोकांना न्याय देणार नसाल तर सरकारने विचार करणे गरजेचे आहे. आरोपीला जात नसते हे लक्षात ठेवावे. आरोपींना पाठिशी घालू नका. समाजाचा संयम सुटला तर तुम्हाला जड जाईल. मराठ्यांच्या भावनेशी खेळत जाऊ नका. आरोपींना अटक करा, त्यांना फाशीची शिक्षा द्या. हे प्रकरण जातीत तोलू नका, असे मनोज जरांगे म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे. राज्यातील शांतता भंग झाली तर याला मुख्यमंत्री जबाबदार राहतील, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. आमचे लेकरु मारुन टाकण्यात आले. ते आरोपी मोकाट असतील. एफआयआर म्हणण्याप्रमाणे लिहून घेत नसाल, तर पोलिस अधिकारी निलंबित करा, अशी मागणीही मनोज जरांगे यांनी केली.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, ही लोकं न्याय मागत आहेत, रास्ता रोको असता तर धिंगाणा झाला असता. गावचे लेकरु मारुन टाकले आहे. सीआयडी चौकशी करा, प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा, प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करु नका, जिल्ह्यातील छाती बडवणाऱ्या नेत्यांना निक्षून सांगतो याला रास्ता रोको समजू नका, जातीत तोलू नका, जातीचे लोक पाठिशी घालू नका. त्यांना आत टाका, अशी मागणी मनोज जरांगे यांनी यावेळी केली.

## आसाराम बापुला तिसऱ्यांदा पॅरोल मिळाली

**जोधपूर** : बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामला तिसऱ्यांदा पॅरोल मिळाला आहे. राजस्थान उच्च न्यायालयाने मंगळवारी आसारामला १७ दिवसांचा पॅरोल दिला. आसारामवर १० नोव्हेंबरपासून ३० दिवसांच्या पॅरोलवर जोधपूरमधील खासगी आयुर्वेदिक रुग्णालयात उपचार सुरू होते. त्याचा पॅरोलचा कालावधी मंगळवारी संपला.

पुण्यातील माधवबाग रुग्णालयात उपचारासाठी आसारामने कोर्टाकडे पॅरोलची मागणी केली होती. न्यायमूर्ती दिनेश मेहता आणि न्यायमूर्ती विनीत माथूर यांच्या खंडपीठाने आसारामला माधवबाग रुग्णालयात उपचारासाठी १५ डिसेंबरपासून १७ दिवसांचा पॅरोल दिला आहे.

आसारामच्या वतीने वकील आरएस सलुजा आणि यशपाल सिंग यांनी बाजू मांडली. आसारामची ११ वर्षांतील ही तिसरी पॅरोल आहे. आसारामला ७ नोव्हेंबर रोजी जोधपूरच्या खासगी आयुर्वेदिक रुग्णालयात उपचारासाठी ३० दिवसांसाठी पॅरोल मंजूर करण्यात आला होता.

यापूर्वी १३ ऑगस्ट रोजी त्याला ११ वर्षांत पहिल्यांदा पॅरोल मिळाला होता. त्यानंतर त्याला सात दिवसांचा पॅरोल मिळाला. २७ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत ते पुण्यातील माधवबाग रुग्णालयात उपचारासाठी गेले होते. त्यानंतर पंचकर्म पूर्ण न झाल्याचा दाखला देत पॅरोल ५ दिवसांनी वाढवण्याचे आवाहन केले होते. न्यायमूर्ती पुष्पेंद्र सिंह भाटी आणि मुन्नरी लक्ष्मण यांच्या खंडपीठाने ३ सप्टेंबरला पॅरोल ५ दिवसांनी वाढवण्याचा आदेश दिला. ७ सप्टेंबरपर्यंत आसारामवर माधवबाग रुग्णालयात उपचार सुरू होते.

१८ ऑक्टोबर रोजी आसारामचा मुलगा नारायण साई यानेही वडिलांना भेटण्याची विनंती केली होती. सुरतच्या लाजपूर मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त असलेल्या साईला गुजरात उच्च न्यायालयाने मानवता लक्षात घेऊन परवानगी दिली होती. यासाठी नारायण साईला ५ लाख रुपये देण्यास सांगितले होते. वडील आसाराम यांना भेटण्यासाठी त्यांना ४ तासांची मुदत देण्यात आली होती.

## लासूर स्टेशन येथील महाविद्यालयाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील यांची नियुक्ती

**लासूर स्टेशन** : विज्ञान महाविद्यालयात नवनियुक्त महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व नवनिर्वाचित सदस्यांचा सोमवारी सत्कार सोहळा पार पडला.

दरम्यान मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य तसेच शिक्षणमहर्षी कै.विनायकराव पाटील यांचे नातू विश्वास भरत पाटील यांची लासूर स्टेशन येथील छत्रपती शाहू महाविद्यालय व शालेय विकास समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. सुरुवातीला छत्रपती शाहू महाराज, कै.विनायकराव पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

छत्रपती शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विकास समिती,न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय विकास समिती व वरद गणेश प्राथमिक शाळा विकास समिती या सर्व समितीच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. यानिमित्त प्राचार्य डॉ. संदीप धिरडे,मुख्याध्यापक मनोज धनाड,मुख्याध्यापक श्री. ढवळे यांनी शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रास्ताविक प्राचार्य संदीप धिरडे यांनी केले. मुख्याध्यापक मनोज धनाड यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. न. ब. कदम यांनी केले. वाल्मीक उगले यांनी आभार मानले.

कार्यकारिणी अशी :

छत्रपती शाहू महाविद्यालय विकास समिती पुढीलप्रमाणे अध्यक्ष विश्वास पाटील ,सदस्य पुंडलिक तुपे,राजेंद्र पोळ,डॉ. लक्ष्मण गायके ,जयदेव जाधव ,सौ छायाताई वाघचौरे,गुलाब शेजूळ ,संजय कापसे, अंबादास गवळी,सुरेश मोडके,संजय जैस्वाल, नितीन कांजुने, फारुक शेख, सोन्याबापू गायके. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय विकास समिती : रामराव शेलार, अर्चना सोमासे, फारुक चौधरी, बापूसाहेब देशमुख, संजय जैस्वाल, प्रदीप चव्हाण, भारती पवार, संतोष जाधव, राजेंद्र डोणगावकर, वैभव सोनवणे, प्रभू बागुल, संतोष हिंगमिरे, देशमुख, प्रदीप पवार, अशोक बोरशे, प्राथमिक शाळा विकास समिती : ताराबाई बोराडे, डॉ. गणेश जाधव, दत्तात्रय नरोडे, मोहशीन शेख, गफ्फार शहा या सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

## इंडिया ब्लॉकचा धनखड यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव

**नवी दिल्ली** : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा मंगळवारी (१० डिसेंबर) ११वा दिवस आहे. इंडिया ब्लॉकने राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव मांडण्याची तयारी केली आहे. धनखड यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्तावाची नोटीस विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेचे सरचिटणीस पीसी मोदी यांना दिली.

या नोटीसवर काँग्रेस, टीएमसी, आप, सपा, डीएमके, सीपीआय, सीपीआय-एम आणि आरजेडीसह अनेक पक्षांच्या ६० खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. धनखड हे पक्षपातीपणे सभागृह चालवत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

त्याचवेळी मंगळवारी रात्री ११ वाजता दोन्ही सभागृहांचे कामकाज सुरू झाले. लोकसभेतील गदारोळामुळे सभागृहाचे कामकाज आधी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. १२ वाजता कामकाज सुरू झाल्यानंतरही अदानी-जॉर्ज सोरोसवरून गदारोळ सुरूच राहिल्याने सभापतींनी सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब केले. या गदारोळामुळे राज्यसभेचे कामकाजही बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, कोणतेही मुद्दे असले तरी आम्ही सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणणार नाही. सपा, टीएमसी आणि काँग्रेससह विविध पक्षांचे अनेक खासदार माझ्याकडे आले. रिजिजू यांच्या म्हणण्यानुसार, संपूर्ण काँग्रेस पक्षाला राज्यसभेत चर्चा करायची आहे, फक्त राहुल गांधींना संसदेच्या कामकाजात भाग घ्यायचा नाही. कदाचित त्यांचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नाही. सर्व खासदारांना चर्चा हवी असते, प्रत्येक खासदारासाठी त्याचा संसदीय मतदारसंघ महत्त्वाचा असतो. राहुल यांच्यासाठी कोणताही मुद्दा महत्त्वाचा नाही.

येथे प्रियांका गांधी म्हणाल्या की, आम्ही जे काही विरोध करत आहोत, ते आम्ही बाहेर करत आहोत. आम्ही रोज प्रयत्न करतो, पण त्यांना (सरकारला) चर्चा नको आहे. दररोज कोणत्या ना कोणत्या निमित्ताने सभागृहाचे कामकाज तहकूब केले जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ डिसेंबर २०२४

## मानवी हक्क आदर्श जीवन जगण्याची गुरुकिल्ली : डॉ अनिल देशमुख







**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** - श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा जि. धाराशिव येथे एनसीसी विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयापासुन बस स्थानकापर्यंत मानवी हक्काविषयी घोषणा देत ही रॅली शहरात काढण्यात आली. तदनंतर या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ अनिल देशमुख उपस्थित होते.

त्यांनी आपल्या भाषणात व्यक्ती प्रतिष्ठेसाठी मानवी अधिकाऱ्याचा लढा कसा सुरू झाला व दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर मानव अधिकाराविषयीची जाणीव निर्माण झालेली आहे. आदर्श जीवन जगण्यासाठी या हक्काची आज गरज आहे असे सांगितले.

भारतीय संविधानाने मूलभूत अधिकाराच्या माध्यमातून भारतीयांना मानव हक्काचे हमी दिली आहे. आज भारतीय संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा, शोषणापासुन स्वरक्षणाचा , धार्मिक स्वातंत्र्याचा, अल्पसंख्यांक स्वरक्षणाचा, घटनात्मक उपाय योजनेच्या अधिकारातून हक्काच्या स्वरक्षणाची हमी दिली आहे. याविषयी सर्वांनी जागरूक राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन डॉ गिरीधर सोमवंशी व प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ पदमाकर पिटले तसेच ५३ महाराष्ट्र बटालियन लातूरचे हवालदार राजेंद्र झाला, कोतकर, सोनटक्के नायक सुनिल काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले कार्यक्रमाचे आभार कॅडेट ओमकार वाघमोडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी , कॅडेटस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवनिर्वाचित आमदार प्रवीण स्वामी यांचा कांदिवली पूर्व मध्ये भव्य सत्कार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** - - उमरगा व लोहारा या विधानसभा मतदार संघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या गटाचे नवनिर्वाचित आमदार श्री प्रवीण जी स्वामी यांचा कांदिवली पूर्व मध्ये भव्य सत्कार समारंभ करण्यात आला सत्काराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री रामचंद्रजी आदावळे उज्वल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,तसेच महात्मा बसवेश्वर मिशन या संस्थेचे मार्गदर्शक श्री शालिवाहन बिरादार,अध्यक्ष श्री काशिनाथ बोळेगावे, सचिव श्री बसवराज बिरादार, खजिनदार श्री नित्यानंद लोखंडे, उपाध्यक्ष श्री अशोकराव हळ्ळे,कांदिवली वार्ड क्रमांक २७ च्या नगरसेविका सुरेखा पाटील, मराठवाडा सेवा संघाचे मनोज पाटील,अध्यक्ष अभंग आंमागे उपाध्यक्ष लातूर स्पोर्ट्स क्लब अध्यक्ष श्री लक्ष्मण फड श्री अर्जुन बिरादार जय हनुमान सेवा संघ अध्यक्ष श्री राजू मुळे व नित्यानंद लोखंडे उपाध्यक्ष तसेचअनुदत्त विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, स्थानी ये वार शाखा अध्यक्ष स्थानी ये वार शाखा महिला अध्यक्ष संघटक व शिवसेना उभाटा गटाचे सर्व कार्यकर्ते भजनी मंडळ व मराठवाड्यातील सर्व उमरगा व उदगीर या परिसरातील नागरिक यांच्या उपस्थित हा कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षांनी मनोगतामध्ये परिसराची,संस्थाची व संस्थेत काम करणा-या कर्मचा-याविषयी आपुलकीची भावना व्यक्त केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## बांगलादेशी हिंदू म्हणाले - भारतात तुरुंगात राहू, परतणार नाही

**ढाका :** बांगलादेशात ५ ऑगस्ट रोजी माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीगचे सरकार पडल्यानंतर हिंदूंवरील हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे.

इस्कॉनशी संबंधित धार्मिक नेते चिन्मय प्रभू यांना २५ नोव्हेंबरला अटक करण्यात आली होती. ३० नोव्हेंबर रोजी बांगलादेशातील ब्राह्मणबारिया जिल्ह्यात त्रिपुराहून कोलकाता मार्गे ढाक्याला जाणाऱ्या बसवर हल्ला झाला होता.

यानंतर त्रिपुरामध्ये बांगलादेशविरोधात निदर्शने सुरू झाली. आगरतळा येथील बांगलादेशी उच्चायुक्तालयाची तोडफोड करण्यात आली. त्रिपुराच्या हॉटेल असोसिएशन आणि हॉस्पिटलने बांगलादेशी नागरिकांसाठी त्यांची सेवा बंद केली आहे. बांगलादेशनेही आगरतळा येथील व्हिसा सेवा बंद करून त्रिपुरातून आपल्या राजनैतिक अधिकाऱ्यांना बोलावले आहे.

त्रिपुरा तीन बाजूंनी बांगलादेशने वेढलेला आहे. शेजारील देशाशी त्याचे सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध आहेत. बांगलादेशातील धोक्यामुळे मोठ्या संख्येने हिंदू लोक देश सोडून त्रिपुरातून अवैधरित्या भारतात प्रवेश करत आहेत. ते म्हणतात की ते भारताच्या तुरुंगात राहतील, पण बांगलादेशात परत जाणार नाही.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ डिसेंबर २०२४


## मी अन् उत्तम जानकर राजीनामा द्यायला तयार : नाना पटोले





**मारकडवाडी :** मतांचा अधिकार संपुष्ट आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. मारकडवाडी गावातील गावकऱ्यांनी उठाव केला. तो उठाव पाहण्यासाठी मी येथे आलो असल्याचे ते म्हणाले. नाना पटोले यांनी मारकडवाडी गावात दाखल झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सरकार, पोलिस प्रशासन आणि निवडणूक आयोग यांच्यावर टीका केली.

आता या लोकांना मताची भीती राहिली नाही. त्यामुळे हे लोक आता राज्य विकतील. मात्र आता माझ्या मतांचा अधिकार शाबूत राहिला पाहिजे. मी १ लाखाने निवडून येणार होतो. पण ते २ हजारावर आले. त्यामुळे मी, उत्तम जानकर राजीनामा द्यायला तयार आहोत, असे मोठे वक्तव्य नाना पटोले यांनी केले.

भाजपच्या नेत्यांना सत्तेची गुरमी चढली असेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे. मात्र, खऱ्या अर्थाने निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. आम्ही जे आक्षेप घेतले, त्या आक्षेपाला उत्तर देण्याची मागणी त्यांनी केली. ७६ लाख मते कशी वाढली? यावर आमचा आक्षेप असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. मॉकपोलला निवडणूक आयोग आणि पोलिसांचा विरोध का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. मारकडवाडी ग्रामस्थांनी लोकशाही वाचवण्यासाठी भूमिका घेतली आहे. आता निवडणुका पुन्हा होणार नाही, मात्र लोकांची मते जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

मारकडवाडीच्या भूमिकेकडे आता देशाचे लक्ष लागले असल्याचा दावा पटोले यांनी केला आहे. शेतकरी आंदोलनावर लाठीचार्ज केला जात आहे. तरुण आपला हक्क मागण्यासाठी जातात तर त्यांच्यावर देखील लाठीचार्ज केला जात आहे. ही हुकूमशाही आहे का? असा प्रश्न पटोले यांनी उपस्थित केला. निवडणूक आयोगाने ईव्हीएम मशीनवर निवडणुका न घेता बॅलेट पेपरवर निवडणूक घेणार असे आदेश काढावे, त्यानंतर राजीनामा द्यायला आम्ही देखील तयार असल्याचेही पटोले यांनी म्हटले आहे.

निवडणूक आयोग कोणाची कठपुतली झाली आहे, हे सर्वांना माहिती आहे. ७६ लाख मत कशी वाढली याचा हिशोब निवडणूक आयोग का देत नाही? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. देशातील नागरिकांचे जे मत आहे, त्याचाच आवाज उठवण्याचे काम मारकडवाडी येथील लोकांनी केले आहे. ही लोकशाही वाचवण्याची लढाई आहे. या लढाईत सर्वांनी सामील व्हायला हवे, ही आमची भूमिका असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

## प्रतीकात्मक मतदान यंत्राची अंत्ययात्रा



**धुळे :** महायुतीचे सरकार ईव्हीएममध्ये घोळ करून सत्तेत आल्याचा आरोप करत सरकार, निवडणूक आयोगाच्या विरोधात शिवसेना ठाकरे गट व काँग्रेसतर्फे मशाल मोर्चा व मतदान यंत्राची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ ईव्हीएमच्या प्रतिकृतीचे दहन करून शोकसभा घेण्यात आली.

शहरातील मालेगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकापासून सोमवारी सायंकाळी मोर्चा व अंत्ययात्रेला सुरुवात झाली. हा मोर्चा आग्रा रोडवरून सरळ महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापर्यंत आला. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी ईव्हीएमची प्रतिकृती असलेल्या तिरडीला खांदा दिला. महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ ईव्हीएमच्या प्रतिकृतीचे दहन करण्यात आले. मोर्चात सहभागी काही जणांनी हातात मशाली घेतल्या होत्या. तसेच पोलिस बंदोबस्तही होता. महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ झालेल्या शोकसभेत काँग्रेसचे भा. ई. नगराळे, शिवसेनेच्या उपनेत्या शुभांगी पाटील, संपर्कप्रमुख अशोक धात्रक, अनिल गोटे यांनी मनोगत व्यक्त करत भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने ईव्हीएममध्ये फेरफार केला. भाजपने हिंमत असेल तर महापालिकेची निवडणूक बॅलेट पेपरवर घ्यावी, असे आव्हान दिले.

राष्ट्रवादीची गैरहजेरी... मशाल मोर्चाचे आयोजन शिवसेना ठाकरे गटाने केले होते. मोर्चात काँग्रेस, भाकपचे पदाधिकारी सहभागी झाले होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी उपस्थित नसल्याचे दिसून आले. निवडणुकीतही राष्ट्रवादीचे काही पदाधिकारी प्रचारात सहभागी नव्हते. त्यामुळे माविआत स्थानिक पातळीवर बिघाडी कायम असल्याची चर्चा आहे.

## अंधश्रद्धा दूर करून संतांनी समाजाला दिला सश्रद्ध दृष्टिकोन : प्रा. सचिन पवार

**सिन्नर :** महाराष्ट्रातील संतपरंपरा महान आहे. समाजप्रबोधनाचे खरे कार्य संतांनीच केले. काही लोक देव मानत नाहीत, तसे संतांनाही मानत नाहीत. परंतु संतांचा विचार केल्याशिवाय महाराष्ट्राच्या वाटचालीचा मागोवाच घेता येणार नाही, असे विचार पुणे येथील प्रा. सचिन पवार यांनी व्यक्त केले.

सिन्नर सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथालय सप्ताहातील पुणे येथील सातवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी संतांचे नेहमी मार्गदर्शन घेतले. संत विचार अनुसरणात आणला, हे विसरता येणार नाही. संत ज्ञानेश्वर, संत जगद्गुरू तुकोबाराय यांनी ईश्वर मांडतानाही वास्तववादाची जाणीव दिली. समाजप्रबोधन करताना अंधश्रद्धा दूर केल्या आणि समाजाला सश्रद्ध दृष्टिकोन दिला हे संतांनी समाजासाठी केलेले कार्य अतिशय अनमोल आहे. संतांनी कधीही जातीभेद मानला नाही. समाजातील अनेक बाबतीतला असमतोल दूर करताना संतांनी समाजाला वाद्य वाजविण्यापासून अनेक बाबतीत समान अधिकार मिळावेत यासाठी प्रबोधन केले. संत विचारांप्रमाणेच त्या आधीची वेद आणि उपनिषदात समाजाच्या कल्याणाचाच विचार मांडलेला आहे. भगवद्गीतेचाही अभ्यास सर्वांनी केला पाहिजे. संत नामदेव महाराजांनी महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून गुजरात आणि पंजाबपर्यंत जाऊन संतपरंपरेचा वारसा सर्वदूर पोहोचवला. धर्मातील समाजहिताचे सार काढून सर्वसामान्यांना धर्माचा खरा अर्थ समजावून सांगण्याचे कार्य संतांनी केले. संत एकनाथ महाराज यांनी त्यांच्या रचना आणि भारुडातून आधुनिकतेचा दृष्टिकोन दिला. समाजातील जातिभेद, उच्चनीचता, स्वभाव दोष दूर व्हावेत येथपासून तर वृक्षवल्ली व वनचरे आम्हा सोयरे असल्याचे सांगण्यापर्यंत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर संतपरंपरेने जनतेला डोळस करण्यासाठी, आपले जीवन खर्ची घातले. त्यामुळे संतपरंपरेने दिलेला विचार हा कालातीत आहे. आजच्या डिजिटल युगातही त्याचे महत्त्व कमी होत नाही, हे वारंवार प्रचितीला येते. त्यामुळे संतांनी समाजासाठी दिलेले योगदान नाकारता येणार नाही. वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत यांनी व्याख्यानमालेस श्रोत्यांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल आभार मानले. त्यासाठी सहकार्य करणारे व्याख्यानांचे प्रायोजक व त्यांची निवास व्यवस्था करणारे पंचवटी मोटेल्सचे संचालक विवेक चांडक व इतरांचे भगत यांनी आभार मानले. निर्मला खिंवसरा यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. जितेंद्र जगताप यांनी सूत्रसंचालन केले. व्याख्यानास उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांना सोडत काढून मीना जोशी, अश्विला शिंदे व कल्याणी जाधव या श्रोत्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

आधुनिक संत कोणाला म्हणावे? व्याख्यानाच्या अखेरीस श्रोत्यांच्या प्रश्नांना पवार यांनी उत्तरे दिली. जयंत आव्हाड यांनी आधुनिक संत कोणाला म्हणावे या केलेल्या प्रश्नास पवार यांनी संत मुक्ताबाई यांचा दाखला दिला. समाजासाठी कार्यरत असलेल्या ज्या कोणाला समाज आदर्श मानतो, त्यांना संत म्हणावे असे सांगितल्याची माहिती त्यांनी दिली. समर्थ रामदास स्वामी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनुषंगाने विचारण्यात आलेल्या प्रश्नास उत्तर देताना याबाबत आपला फार अभ्यास नाही. मात्र, रामदास स्वामी हे संत होते. याबाबत कुठलेही दुमत नाही असे ते म्हणाले. तर, संत तुकाराम महाराज वैकुंठाला गेले याबाबत मतमतांतरे असली तरी, रामदास स्वामी यांना ब्राह्मणांनी त्रास दिला हे अजिबात मान्य नाही. कारण त्यांच्या शिष्यगणात ब्राह्मणांची संख्या मोठी होती, असे उत्तर त्यांनी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ११ डिसेंबर २०२४


## सांस्कृतिक कार्यक्रम पर्यटनास चालना देणारे : विजय संतान



**अमरावती :** सांस्कृतिक कार्यक्रम हे सांस्कृतिक पर्यटनास चालना देण्यास पुरस्कृत असावे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक सेवा अमरावती विभागाचे उपसंचालक विजय संतान यांनी केले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, युवा कार्यक्रम तथा क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र, रासेयो व शिवाजी शिक्षण संस्थेच्या संयुक्त सहकार्याने नुकताच जिल्हास्तरीय युवा महोत्सव विमलाबाई देशमुख सभागृहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा व युवक सेवा अमरावती विभागाचे उपसंचालक विजय संतान होते. प्रमुख पाहुणे निवृत्त उपशिक्षणाधिकारी पंडित पंडागडे, प्रा. पंकज नागपुरे, प्राचार्य गजानन कोरपे, प्राचार्य प्रमोद गांवडे, नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव उपस्थित होते.

विजय संतान यांनी अमरावती जिल्ह्यातील युवा कलाकारांकरिता एक हक्काचे व्यासपीठ होण्याच्या दृष्टिकोनातून विभागीय क्रीडा संकुलात एक हजार आसन व्यवस्था असलेले सभागृह पुढील काळात निर्माण करण्याबाबत सूतोवाच केले. गणेश जाधव यांनी प्रास्ताविकातून युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवकांच्या कला गुणांना प्रदर्शित करण्याची संधी प्राप्त होते, असे मत व्यक्त केले, तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरिता विकसित भारत यंग लिडर्स डॉयलॉगकरिता माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले. सर्व प्रावीण्यप्राप्त स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरवले.

लोकगीत स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अतुल सुंदरकर, प्रा. डॉ. भोजराज चौधरी, प्रा. रवींद्र गिरी, तसेच लोकनृत्य स्पर्धेसाठी डॉ. पायल रोकडे, भारत मोंढे, तेजस्विनी समर्थ यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन मंजित मेश्राम, शिशिर मेश्राम यांनी केले, तर आभार स्नेहल बासुतकर यांनी मानले. नव संकल्पना स्पर्धेतील विजेते : नव संकल्पना स्पर्धेत वैयक्तिक गटात संकेत कोरडे, आभा बंड, अर्पिता जिचकार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना स्पर्धेत सामूहिक गटात वैभवी जगताप व नचिकेत यावले प्रथम, गायत्री सरदार व वैष्णवी ठाकरे द्वितीय, सिद्धी ठाकूर व तनिषा तायडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. परीक्षक म्हणून डॉ. स्वप्निल अरसड, डॉ. श्रीकांत वडाळ, डॉ. सौरभ पवनीकर यांनी काम पाहिले. हे आहेत विविध स्पर्धांमधील विजेते : कथा लेखन-शेजल गडधे प्रथम, व्यंकटेश नेरकर द्वितीय, अवंतिका मिलखे तृतीय. चित्रकला-मुकेश अढाऊ प्रथम, जयंत गीद द्वितीय, मेघना नंदागवळी तृतीय.

कविता लेखन-सिया परिहार प्रथम, जुही वानखडे द्वितीय, पूजा गुंजरकर तृतीय. वक्तृत्व स्पर्धेत-सौरभ गुडधे प्रथम, श्रावणी रोटे द्वितीय, मुक्तीका कुबडे तृतीय. महोत्सवा दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह लोकगीतामध्ये प्रथम क्रमांक जिगीषा बहुउद्देशीय संस्थेने पटकावला.

आरडीआयके महाविद्यालय व ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाने अनुक्रम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. लोक नृत्यामध्ये आरडीआयके महाविद्यालयाने प्रथम, तर विमलाबाई देशमुख महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. युवा महोत्सवातील पुरस्कार प्राप्त विद्यार्थी व उपस्थित मान्यवर. लोकगीत, लोकनृत्य स्पर्धेतील विजेते

## मतदारसंघातील अवैध धंदे बंद करा : आमदार तोडसाम



**पांढरकवडा :** आर्णी-केळापूर मतदार संघातील भाजपचे आमदार राजू तोडसाम यांनी रविवारी दि. ७ डिसेंबरला विधिमंडळ अधिवेशनात आमदारकीची शपथ घेतल्यानंतर प्रथम मतदार संघातील ठाणेदारांना परिसरातील अवैध धंदे तातडीने बंद करण्याचे आदेश दिले.

विशेष करून पांढरकवडा शहरांमध्ये गांजाची मोठ्या प्रमाणात विक्री केल्या जाते. यासंदर्भात सामाजिक संघटनांनी पोलिस प्रशासनाला विविध निवेदने देऊन गांजा विक्री बंद करण्याची मागणी केली होती. मात्र, यावर पायबंध घालण्यात पोलिस प्रशासनाला अपयश आले. अवैध व्यवसाय फोफावत गेला. गांजामुळे व्यसनाधीन युवकांची पिढी बरबाद होत गेली. केळापूर मतदारसंघात घाटंजी, पांढरकवडा व अन्य ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे बोकाळले आहे. दारू, गांजा तस्करी व विक्री, वरली मटका अन्य जुगार मोठ्या प्रमाणात खेळला जातो. यामध्ये कोट्यवधींची उलाढाल होते. यामुळे विद्यार्थीदशेतील युवक हा व्यसनाच्या आहारी गेला. ही बाब आमदार राजू तोडसाम यांच्या निदर्शनात आली.






## एड्स आजाराला रोखण्यासाठी प्रतिबंध हाच रामबाण उपाय : डॉ. दवणे

**पाचोड :** आपणास विविध आजार होण्याची शक्यता असताना आपण त्यामध्ये धोका न घेता उपायापेक्षा प्रतिबंध बरा, हाच त्यावर उपाय आहे, असे प्रतिपादन पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयाचे दंतशल्यचिकित्सक डॉ. राहुल दवणे यांनी जागतिक एड्स नियंत्रण दिनानिमित्त जनजागृती करताना विद्यार्थ्यांना सांगितले.

शिवछत्रपती महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठांतर्गत बीसीए केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय पाचोड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 6 डिसेंबर रोजी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यामध्ये ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ. दवणे म्हणाले की एड्स, त्याची लक्षणे, उपाय, उपचार यासारख्या बाबी विद्यार्थ्यांनी या वयात समजून घेऊन त्यापासून दूर राहणे गरजेचे आहे. डॉ. दवणे म्हणाले की आज टॅटू काढण्याची पद्धत आहे. टॅटू काढताना सुईचा वापर केला जातो आणि ही सुई एकमेकांच्या शरीरामधून गेलेली असल्याने त्या ठिकाणीही एड्स होण्याची शक्यता असते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य आप्पासाहेब नेमाने, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख डॉ. हरिप्रसाद बिडवे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. भगवान जायभाये, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गजानन कापडे, लिंक वर्कर संतोष कुलकर्णी, छाया काकडे, सिद्धार्थ वाव्हुळे आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. सुभाष पोटभरे यांनी विद्यार्थ्यांना एड्स जनजागृतीसंदर्भात शपथ दिली.

सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य आप्पासाहेब नेमाने तर आभार प्रा. दीपक कोकरे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

रक्त चाचणी, दाढी करताना घ्या काळजी ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक नितीन गडकरी यांनी रक्त चाचणी, त्याचबरोबर असुरक्षित संभोग, इंजेक्शन सुई, सलूनमध्ये दाढी करतानाचे प्रकार याविषयी सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर समुपदेशक किशोर स्वास्थ्य कार्यक्रमाचे अमोल मोरखडे यांनी एड्सचा उदय, त्याची कारणे आणि परिणाम याविषयी विद्यार्थ्यांचे उदाहरणाद्वारे समुपदेशन केले.